सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - १२/२०२४-२०२५

सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **मंगळवार दि.१५/१०/२०२४ रोजी दुपारी ०२.३० वाजता महानगरपालिका मुख्यालय येथील कै.राजाभाऊ हरिभाऊ जगदाळे सभागृह, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

९२४ ते ९३२

९३३ १. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.११/१०/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

९३४ २. कुपवाड स.नं.२२१/१ (जुना २६९/१ पैकी) व स.नं.२२० (जुना२६८ पैकी) या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र.३२२ व्हेजिटेबल मार्केट व जनता बाजार या आरक्षणाने व डी.पी.रस्त्याने बाधीत क्षेत्राच्या नुकसान भरपाई देणेकामी धोरणात्मक निर्णयार्थ **उपायुक्त मुख्यालय (नगररचना विभाग कुपवाड) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

९३५ ३. कुपवाड सर्व्हे नं.५९/२ (जूना १०७/२) यामंजूररेखांकनातील १२.० मी व १८.० मीडी.पी. रस्त्याने बाधीत क्षेत्राच्या नुकसान भरपाई देणेकामी धोरणात्मक निर्णयार्थ **उपायुक्त मुख्यालय (नगररचना विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

९३६ ४. UDCPR २०२० मधील तरतूदींचे प्रभावी अंमलबजावणी व ऑनलाईन बांधकाम परवानगी बाबत धोरणात्मक निर्णयार्थ **उपायुक्त मुख्यालय (नगररचना विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

९३७ ५. कुपवाड सर्व्हे नं.१६४ (जुना सर्व्हे नं.२१२) या मंजूर रेखांकनातील ३०.४८ मी, (१०० फुटी) डी.पी. रस्त्याने बाधीत क्षेत्राच्या नुकसान भरपाई श्री.अक्षय पाटील व इतर यांना आदा करणेस मान्यता देणेकामी धोरणात्मक निर्णयार्थ **उपायुक्त मुख्यालय (नगररचना विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

९३८ ६. कुपवाड सर्व्हे नं.१६४ (जुना सर्व्हे नं.२१२) या मंजूर रेखांकनातील ३०.४८ मी, (१०० फुटी) डी.पी. रस्त्याने बाधीत क्षेत्राच्या नुकसान भरपाई सिमा अरविंद कोल्हापूरे यांना आदा करणेस मान्यता देणेकामी धोरणात्मक निर्णयार्थ **उपायुक्त मुख्यालय (नगररचना विभाग,सांगली) यांचे दि.१९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

७. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील कोल्हापूर रोड आकाशवाणी चौकास शौर्य चक्र विजेते विंग कमांडर नवले चौक असे नामकरण करणेकामी नामकरणाचा प्राथमिक इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१५/१०/२०२४ चे विषयपत्र.**

८. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील काळी खण लगत उद्यानाला महावीर चक्र विजेते शहीद श्री.पांडूरंग साळुंखे उद्यान असे नामकरण करणेकामी नामकरणाचा प्राथमिक इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१५/१०/२०२४ चे विषयपत्र.**

९. सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पातील E- १२११) लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना या लेखाशिर्षामध्ये र.रु.२६,१३,७७,१६४/- मात्रची इतकी तरतुद करणेस मान्यता देणेकामी अतिरिक्त आयुक्त **(बांधकाम विभाग) यांचे दि.१५/१०/२०२४ चे विषयपत्र.**

१०. महानगरपालिका कार्यक्षेत्रात नागरिकांना अत्यावशक सुविधा देणे साठी शववाहिका, डॉगव्हॅन, फिरत शौचालय व मैला उपसागाडी हि वाहने सध्या आकारण्यात येणारी शुल्कामध्ये दर सुधार समितीने केले शिफारशीनुसार दर वाढ करणेस मान्यता देणेकामी **लेखाधिकारी (लेखा विभाग) यांचे दि.१५/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

११. क २ साफ सफाई व सोई E -०२५८ वाहन देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षावर रक्कम वाढवून मिळणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त मुख्यालय (कार्यशाळा विभाग) यांचे दि.१५/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

१२. महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध आस्थापना, व्यवसाय, इमारती, हॉस्पीटल, शाळा, महाविदयालये, शासकीय व निमशासकीय इमारत अन्य इमारत धारक यांच्या इमारतीचे फायर ऑडीट शुल्कामध्ये दर सुधार समितीने केले शिफारशीनुसार दर वाढ करणेस मान्यता देणेकामी **लेखाधिकारी (लेखा विभाग) यांचे दि.१५/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

१३. कार्यकारी अभियंता,पा.पु. व जलनि:सारण अभियंता यांनी नमुना नं.१० नुसार प्रस्तावित केलेप्रमाणे सन २०२४-२५ या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष "E-१११२- मा.आयुक्त निधी र.रु.७ कोटी मधून "E-१०३९- विकास निधी या लेखाशिर्षावर र.रु.६ कोटी तरतूद पुनर्विनियोजन करणेस व उक्त कामी येणारा खर्च E-१०३९- विकास निधी मधून करणेस मान्यता देणेकामी दिलेली सूचना.

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२४-२५ दिनांक :-१५/१०/२०२४ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण प्रशासक सभा क्र.१२ दि.१५/१०/२०२४ रोजी महानगरपालिका मंगलधाम कार्यालय,सांगली येथे दुपारी ०२:३० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक सर्वसाधारण सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ.क्र.	उपस्थितांची नावे	अ.क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.शुभम गुप्ता - प्रशासक	१४.	श्रीम.प्रज्ञा त्रिभुवन – सहा.आयुक्त, प्र.स.क्र.२
२.	श्री.रविकांत आडसुळ – अतिरिक्त आयुक्त,मिरज	१५.	श्री.अनिस मुल्ला – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.४
३.	श्री.वैभव साबळे – उपायुक्त मुख्यालय	१६.	श्री.राजेंद्र काकडे – नगररचनाकार,
४.	श्री.पृथ्वीराज चव्हाण - शहर अभियंता	१७.	श्री.राहुल मुळीक – प्र.सहा.ग्रंथपाल
५.	श्री.रविंद्र ताटे - वै.आ.अधिकारी, सार्व.आरोग्य	१८.	श्री.गिरीष पाठक – प्र.उद्यान अधिक्षक
६.	श्री.चिदानंद कुरणे- जल./पापु.अभियंता, सां./मि.	१९.	श्री.समीर जमादार – विधी विभाग अधिकारी
७.	श्री.सहदेव कावडे - सहा.आयुक्त १/ नगरसचिव	२०.	श्री.दिलीप घोरपडे – प्र.अतिक्रमण अधिक्षक
८.	श्री.सचिन सागावकर – सहा. आयुक्त,प्र.स.क्र.३	२१.	श्री.अजित गुजराथी – पर्यावरण अभियंता
९.	श्री.अमर चव्हाण – विद्युत अभियंता	२२.	श्री.अशोक मानकापुरे - अधिक्षक, सा.प्र.वि.
१०.	श्री.नकुल जकाते - सिस्टीम मॅनेजर	२३.	श्री.विनायक शिंदे – सहा. आयुक्त, म.आ.कक्ष
११.	श्री .सुनिल माळी - अग्निशमन अधिकारी	२४.	श्री.धनंजय हर्षद – प्र.मालमत्ता अधिकक्षक/जनसंपर्क अधिकारी
१२.	श्री.विनायक जाधव – ज्य.इंजि.वर्कशॉप,मिरज	२५.	श्री.रंगराव आठवले – प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग
१३.	श्री.सुनिल पाटील – विशेष कार्य.अधिकारी		

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१	मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.११/१०/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. ०२	कुपवाड स.नं.२२१/१ (जुना २६९/१ पैकी) व स.नं.२२० (जुना२६८ पैकी) या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र.३२२ व्हेजिटेबल मार्केट व जनता बाजार या आरक्षणाने व डी.पी.रस्त्याने बाधीत क्षेत्राच्या नुकसान भरपाई देणे
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.०३	कुपवाड सर्व्हे नं.५९/२ (जूना १०७/२) यामंजूररेखांकनातील १२.० मी व १८.० मीडी.पी. रस्त्याने बाधीत क्षेत्राच्या नुकसान भरपाई देणे
प्रशासक	विषय मंजुर
विषय क्र.०४	UDCPR २०२० मधील तरतूदीचे प्रभावी अंमलबजावणी व ऑनलाईन बांधकाम परवानगी बाबत
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.०५	कुपवाड सर्व्हे नं.१६४ (जुना सर्व्हे नं.२१२) या मंजूर रेखांकनातील ३०.४८ मी, (१०० फुटी) डी.पी. रस्त्याने बाधीत क्षेत्राच्या नुकसान भरपाई श्री.अक्षय पाटील व इतर यांना आदा करणेस मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.०६	कुपवाड सर्व्हे नं.१६४ (जुना सर्व्हे नं.२१२) या मंजूर रेखांकनातील ३०.४८ मी, (१०० फुटी) डी.पी. रस्त्याने बाधीत क्षेत्राच्या नुकसान भरपाई सिमा अरविंद कोल्हापूरे यांना आदा करणेस मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजूर

... २ ...

विषय क्र.०७	महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील कोल्हापूर रोड आकाशवाणी चौकास शौर्य चक्र विजेते विंग कमांडर नवले चौक असे नामकरण करणेकामी नामकरणाचा प्राथमिक इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.०८	महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील काळी खण लगत उद्यानाला महावीर चक्र विजेते शहीद श्री.पांडूरंग साळुंखे उद्यान असे नामकरण करणेकामी नामकरणाचा प्राथमिक इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.०९	सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पातील E- १२११) लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना या लेखाशिर्षामध्ये र.रु.२६,१३,७७,१६४/- मात्रची इतकी तरतुद करणेस मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.१०	महानगरपालिका कार्यक्षेत्रात नागरिकांना अत्यावशक सुविधा देणे साठी शववाहिका, डॉगव्हॅन, फिरत शौचालय व मैला उपसागाडी हि वाहने सध्या आकारण्यात येणारी शुल्कामध्ये दर सुधार समितीने केले शिफारशीनुसार दर वाढ करणेस मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.११	क २ साफ सफाई व सोई E -०२५८ वाहन देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षावर रक्कम वाढवून मिळणेस मान्यता देणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.१२	महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध आस्थापना, व्यवसाय, इमारती, हॉस्पीटल, शाळा, महाविदयालये, शासकीय व निमशासकीय इमारत अन्य इमारत धारक यांच्या इमारतीचे फायर ऑडीट शुल्कामध्ये दर सुधार समितीने केले शिफारशीनुसार दर वाढ करणेस मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र.१३	कार्यकारी अभियंता,पा.पु. व जलनि:सारण अभियंता यांनी नमुना नं.१० नुसार प्रस्तावित केलेप्रमाणे सन २०२४-२५ या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष "E-१११२- मा.आयुक्त निधी र.रु.७ कोटी मधून "E-१०३९- विकास निधी या लेखाशिर्षावर र.रु.६ कोटी तरतूद पुनर्विनियोजन करणेस व उक्त कामी येणारा खर्च E-१०३९- विकास निधी मधून करणेस मान्यता देणेकामी दिलेली सूचना.
प्रशासक	विषय मंजूर

येणेप्रमाणे सभेचे कामकाज सर्व उपस्थित अधिकारी यांच्या सहमतीने पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

both pages signed,

दिनांक :- १५/१०/२०२४

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १३३ **दिनांक :-** १५/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.११/१०/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.१२४ ते ठराव क्र.१३२ चे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १३४ **दिनांक :- १५/१०/२०२४**

विषय क्रमांक :- ०२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (नगररचना विभाग कुपवाड) यांचे दि.१४/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील कुपवाड येथील स.नं. स.नं. २२१ / १ (जुना २६९/१ पैकी) व स.नं. २२० (जुना २६८ पैकी) या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. ३२२ व्हेजिटेबल मार्केट व जनता बाजार नियोजीत उत्तर दक्षिण ३०.४८ मी. डी.पी. रस्ता तसेच आरक्षण क्र. ३१७ फायर स्टेशन व पूर्व पश्चिम ९.०० मी. नियोजीत रस्ता, आरक्षण क्र. ३२३ पार्किंग व आरक्षण क्र. ३२४ मंगल कार्यालय / कम्युनिटी हॉल व उर्वरीत भाग रहिवास विभागामध्ये समाविष्ठ आहे. सदर प्रकरणी मा.माजी महापौर यांनी सदरचे आरक्षण तातडीने संपादीत करुन अद्ययावत भाजी मंडई उभारणेबाबत कारवाई करणेकामी दि.२३/०३/२०२१ रोजी या कार्यालयाकडे कळविले होते. तसेच माजी सन्मा.सदस्य श्री.राजेंद्र लक्ष्मण कुंभार यांनी सदर जागेमध्ये भाजी मंडई विकसीत केलेस नागरिकांना त्याचा मोठ्या प्रमाणावर फायदा होणार असून उक्त मिळकतीवर सर्व सोईसुविधांनीयुक्त भाजी मंडई विकसीत करणेबाबत मा.आयुक्तसो यांना दि.२९/१०/२०१८ रोजी कळविले होते.

उक्त मिळकतीमध्ये तत्कालिन आरेखक यांचेकडून रितसर विकास योजना अभिप्राय घेणेत आला असून वरील प्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास येते. तरी वरील वस्तुस्थितीच्या अनुषंगाने सदरचे आरक्षणाखालील क्षेत्र ताब्यात घेणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२६ नुसार मा.महासभेपूढे दि.१४/०६/२०२३ रोजी विषयपत्र सादर करणेत आले होते.

मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. ३२२ व्हेजिटेबल मार्केट व जनता बाजार नियोजीत उत्तर दक्षिण ३०.४८ मी. डी.पी. रस्ता तसेच आरक्षण क्र. ३१७ फायर स्टेशन व पूर्व पश्चिम ९.०० मी. नियोजीत रस्ता, आरक्षण क्र. ३२३ पार्किंग व आरक्षण क्र. ३२४ मंगल कार्यालय / कम्युनिटी हॉल व उर्वरीत भाग रहिवास विभागामध्ये समाविष्ठ असून एकूण संपूर्ण आरक्षणाचे क्षेत्र कलम ३१ (१) अन्वये खालील आहे.

अ.क्र.	आरक्षण	क्षेत्र
१	आरक्षण क्र. ३२२ व्हेजिटेबल मार्केट व जनता बाजार	५८५०.०० चौ.मी.
२	उत्तर दक्षिण ३०.४८ मी. नियोजीत डी.पी. रस्ता	३१३५.०० चौ.मी.
३	पूर्व पश्चिम ९.०० मी. नियोजीत रस्ता	१२४२.०० चौ.मी.
४	आरक्षण क्र. ३१७ फायर स्टेशन	३५७५.०० चौ.मी.
५	आरक्षण क्र. ३२३ पार्किंग	५४५.०० चौ.मी.
६	आरक्षण क्र. ३२४ मंगल कार्यालय / कम्युनिटी हॉल	२७५२.०० चौ.मी.
	व उर्वरीत क्षेत्र रहिवास विभागामध्ये समाविष्ठ आहे.	

उक्त मिकतीचे ७/१२ उतारा पाहता, स.नं. २२० व स.नं. २२१ / १ कलगोंडा पिरगोंडा पाटील व इतर यांच्या मालकीचे असून एकूण क्षेत्र १ हे. ४ आर + ७३ आर एकूण १ हे ७७ आर असे होत असून याचे ७/१२ उतारे व फाळणी नकाशा प्रस्तावासोबत लगत आहे. सदर फाळणी नकाशावरती वरील परिच्छेद क्र. १ मध्ये नमूद सर्व आरक्षणे फाळणी नकाशावर आरेखक यांनी दर्शविलेले आहेत. तसेच सदर जागेची खाजगी अभियंता श्री.तुषार पाटील यांच्याकडून रितसर मोजणी करण्यात आली असून जागेवरील वस्तुस्थिती ही फाळणी नकाशाशी सुसंगत आहे.

त्यानुसार उक्त आरक्षणाखालील क्षेत्र डीमार्केट करण्यात आले असून त्याचे क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. वर नमूद केलेनुसार उक्त मिळकतीमध्ये आरक्षणाने बाधीत क्षेत्र खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	आरक्षण	क्षेत्र
१	आरक्षण क्र. ३२२ व्हेजिटेबल मार्केट व जनता बाजार	३३१५.०० चौ.मी.
२	उत्तर दक्षिण ३०.४८ मी. नियोजीत डी.पी. रस्ता	१९५३.०० चौ.मी.
३	पूर्व पश्चिम ९.०० मी. नियोजीत रस्ता	१२४२.०० चौ.मी.
४	आरक्षण क्र. ३१७ फायर स्टेशन	२४२४.०० चौ.मी.
५	आरक्षण क्र. ३२३ पार्किंग	५३२.०० चौ.मी.
६	आरक्षण क्र. ३२४ मंगल कार्यालय / कम्युनिटी हॉल	२०४०.०० चौ.मी.
	व उर्वरीत क्षेत्र रहिवास विभागामध्ये समाविष्ठ आहे.	

मा.महासभेने पारित केलेल्या ठरावानुसार वरील पैकी आरक्षण क्र. ३२२ व्हेजिटेबल मार्केट व जनता बाजार, उत्तर दक्षिण ३०.४८ मी. नियोजीत डी.पी. रस्ता, पूर्व पश्चिम ९.०० मी. नियोजीत रस्ता ही आरक्षणे ताब्यात घेणेचो असून त्याचे एकूण क्षेत्र ६५१०.०० चौ.मी. इतके होत आहे. तसेच सदर आरक्षणास पूर्वेकडून ९.०० मी. विद्यमान पोहोच रस्ता उपलब्ध आहे.

केंद्र शासनाच्या भूमी संपादन, पूर्नवसन व पूर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा अधिनियम, २०१३ (The Right to Fair Compensation and Transparency in land Acquisition Rehabilitation and Resettlement Act २०१३) हा नवीन कायदा दि.०१/०१/२०१४ पासून अंमलात आला आहे. भुसंपादन प्रकरणामध्ये मुल्यांकन करताना जमीन मालकांना दिलासा रक्कम यापूर्वीच्या कायद्यानुसार ३० % प्रमाणे देण्यात येत होतो. आता नवीन कायद्यानुसार ती १०० % करण्यात आली आहे.

तसेच यापूर्वी महानगरपालिकेमार्फत दि.२०/०५/२०२१ रोजी पत्राद्वारे सदर मिळकतधारक पत्राद्वारे TDR अथवा AR पध्दतीने सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात देणे बाबत कळविले असता.सदर मिळकतधारक यांनी दि.१२/०५/२०१५ व दि.२५/०१/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार खाजगी वाटाघाटीने दुप्पट रक्कम व त्यावरील व्याजासह नुकसान भरपाई दयावी अथवा आम्हांस कायदेशीर मार्गाचा अंवलब करावा लागेल असे लेखी स्वरुपात उत्तर दिलेले आहे.मा.न्यायालयाचा यापूर्वीचा अनुभव पाहता (स.न.९३५ भागीरथी गवळी विरुध्द महानगरपालिका)मिळकतधारकांच्या बाजूने आता पर्यंत निकाल लागले असून व्याजासह रक्कम देणेबाबत मा.न्यायालयाने आदेशित केल्याचा पूर्वानुभव आहे.तसेच मा.जिल्हाधिकारीसो यांचेकडून सक्तीने भूमी संपादन करणे कामी प्रस्ताव सादर केले असता.मा.महासभेने निश्चित केलेल्या रक्कमेपेक्षा जादाची रक्कम देणे बाबत कार्यवाही केलेली आहे.तसेच मा.महासभेने यापूर्वी भूमिसंपादना बाबत खाजगी वाटाघाटीने रक्कम स्वरुपात रेडीरेकनरच्या दुप्पट रक्कम नुकसान भरपाई देणे बाबत.ठराव केला असून तशी कार्यवाही प्रशासनाकडून झालेली आहे.तसेच सदस्थितीला सदर सर्व्हे नंबर लगत जमिनिचे चालू बाजार भावा नुसार होणारे व्यवहार हे रेडीरेकनरच्या दुप्पट दरापेक्षा जास्त रक्कमेचे होताना दिसत आहेत.

सदरील नुकसान भरपाई देणे शक्य असलेने उक्त तिन्ही आरक्षण क्र. आरक्षण क्र. ३२२ व्हेजिटेबल मार्केट व जनता बाजार, उत्तर दक्षिण ३०.४८ मी. नियोजीत डी.पी. रस्ता, पूर्व पश्चिम ९.०० मी. नियोजीत रस्त्याने बाधीत एकूण क्षेत्र खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	मिळकत धारक	आरक्षण	एकूण क्षेत्र
१	कलगोंडा पिरगोंडा पाटील व इतर	आरक्षण क्र. ३२२ व्हेजिटेबल मार्केट व जनता बाजार	३३१५.०० चौ.मी.
२		उत्तर दक्षिण ३०.४८ मी. नियोजीत डी.पी. रस्ता	१९५३.०० चौ.मी.
३		पूर्व पश्चिम ९.०० मी. नियोजीत रस्ता	१२४२.०० चौ.मी.
		एकूण	**६५१०.०० चौ.मी.**

सदर जागेची चालू शासकीय मुल्यंकन दरानुसार सन २०२३-२४ मधील वार्षिक बाजारमुल्य दर तक्त्यानुसार विभाग क्र. १३/८१ अंतर्गत सांगली-कुपवाड रस्ता क्षेत्र खुली जमीन रुपये ६४८०/- प्रती चौ.मी. दर आहे.

वरील प्रमाणे मिळकत धारक यांचे डी.पी. रस्त्याने बाधीत क्षेत्र ६५१०.०० चौ.मी. असून त्याची किंमत मुल्य अंदाजे - ६५१०.०० x ६४८०/- = ४,२१,८४,८००/- इतकी होत आहे. तरी भूमी संपादन, पूनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा अधिनियम १०१३ व महसूल व वन विभागाचे दि.१२/०५/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार १००% दिलासा रक्कम व २५% वाढीव रक्कम यानुसार एकूण देय भुसंपादनाची नुकसान भरपाई खालील प्रमाणे.

अ.क्र.	आरक्षण	बाधीत क्षेत्र	तपशिल	रक्कम रुपये
१	आरक्षण क्र. ३२२ व्हेजिटेबल मार्केट व जनता बाजार	६५१०.४३ चौ.मी.	जमिनीची किंमत	४,२१,८४,८००/-
२	उत्तर दक्षिण ३०.४८ मी. नियोजीत डी.पी. रस्ता		१०० % दिलासा रक्कम	४,२१,८४,८००/-
३	पूर्व पश्चिम ९.०० मी. नियोजीत रस्ता		एकूण	८,४३,६९,६००/-
			२५ % वाढीव रक्कम	१,०५,४६,२००/-
			एकूण रक्कम रुपये	९,४९,१५,८००/-

वरील मुल्यांकनाच्या अनुषंगाने अतिरीक्त घटक रक्कम रु.१,०५,४६,२००/- मात्र वजा करुन नुकसान नुकसान भरपाई देणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२६ (अ) नुसार खाजगी वाटाघाटीमध्ये वरील रक्कम रु.८,४३,६९,६००/- मात्र स्विकारणेस मिळकत धारक संमत असलेने खाजगी वाटाघाटीने सदर भुसंपादन रक्कम अंतीम करुन सदर आरक्षण व डी.पी.रस्त्याने बाधीत क्षेत्राची रितसर कब्जेपट्टी घेऊन, सदरची जागा महानगरपालिकेच्या नावावर झाल्यानंतर प्रस्तावित प्रमाणे नुकसान भरपाई देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

All page signed.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सहा. संचालक (न.र.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १३५ **दिनांक :-** १५/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (नगररचना विभाग,सांगली) यांचे दि.१४/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील कुपवाड येथील सर्व्हे नं.५९/२ (जूना १०७/२) याचे ७/१२ उताऱ्यानुसार ३ हे. ९५ आर (३९५००.०चौ.मी.) क्षेत्र असून याचे रेखांकन दि.३१/०५/२०१६ ला मंजूर केले असून मा.तहसिलदार मिरज यांचेकडील बिगरशेती आदेश क्र. जमीन/बि.शे./सनद/एस.आर-१०/१७ दि.२८/०९/२०१७ चे आदेशात झालेले आहे. तसेच तालुका निरीक्षक भूमी अभिलेख मिरज मु. सांगली या कार्यालयाकडून मोजणी नकाशा अंतिम करणेत आलेला आहे. सदर मोजणी नकाशानुसार अंतर्गत रस्ते, खुली जागा या क्षेत्रास महानगरपालिकेच्या नावाची नोंद करून अंतिम मंजूरीसाठी प्रकल्प सादर केला आहे.

तसेच सदर रेखांकनातील १२.० मी व १८.० मीडी.पी. रस्ता व रोड वायडिंग खालील क्षेत्राची कब्जेपट्टी मिळकत या श्री.जंबुकुमार देवगोंडा पाटील व इतर यांनी नुकसान भरपाई रक्कम स्वरूपात मिळणेचे अटीवर देणेत आली आहे व सदर डी.पी. रस्त्याचे क्षेत्र ५६८८.२५ चौ.मी. व रोडवायडिंगखालीलक्षेत्र ५२८.५० चौ.मी. या क्षेत्राच्या ७/१२ उताऱ्यास मनपाच्या नावाची नोंद केली आहे व त्यानुसार सदर डी.पी. रस्त्याने वाधीत क्षेत्राची नुकसान भरपाई मिळावी असा विनंती अर्ज दि.०८/०९/२०२२ रोजी श्री.जंबुकुमार देवगोंडा पाटील व इतरयांनीकेलाआहे.

केंद्र शासनाच्या भूमीसंपादन, पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारर्दशकतेचा अधिनियम 2013 (The right to fair compensation and transparency in land acquisition Rehabiliation and resettlement Act २०१३) हा नविन कायदा दि.०१/०१/२०१४ पासून अमंलात आला आहे. भूसंपादन प्रकरणामध्ये मुल्यांकन करताना जमीन मालकांना दिलासा रक्कम यापुर्वीच्या कायद्यानुसार ३० टक्केप्रमाणे देण्यात येत होती. आता नवीन कायद्यानुसार ती १०० टक्के करण्यात आली आहे. सबब सदरील नुकसान भरपाई देणे शक्य असलेल्या ६२१६.७५ चौ.मी. जागेची चालू शासकीय मुल्यांकन दरानुसार सन २०२३-२४ मधील वार्षिक बाजारमुल्य दर तक्त्यानुसार विभाग क्र. १३/८७ अंतर्गत सांगली कुपवाड रस्त्याच्या दक्षिणेकडील क्षेत्र खुली जमीन रूपये ४२८०/= प्रती चौ.मी. दर आहे. जमीनीचे किंमतमुल्य अंदाजे

६२१६.७५ x ४२८०/- २,६६,०७,६९०/-

अ.क्र.	तपशिल	रक्कमरु.
१	जमिनीची किंमत	२,६६,०७,६९०/-
२	१०० टक्केदिलासारक्कम	२,६६,०७,६९०/-
	एकूण	**५,३२,१५,३८०/-**

वरील मुल्यांकनाच्या अनुषंगाने अतिरीक्त घटक रक्कम रु.६३,८५,८४५/- मात्र वजा करण्यात आली असून नुकसान भरपाई देणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२६ (अ) नुसार खाजगी वाटाघाटीमध्ये वरील रक्कम रु.५,३२,१५,३८०/- मात्र स्विकारणेस मिळकतधारक संमत असलेने खाजगी वाटाघाटीने सदर भुसंपादन रक्कम अंतिम करून, सदरची जागा महानगरपालिकेच्या नावावर झाल्यानंतर सदर डी.पी. रस्त्याने बाधीत क्षेत्राची नुकसान भरपाई देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सह. संचालक (न.र.)
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १३६ **दिनांक** :- १५/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (नगररचना विभाग,सांगली) यांचे दि.१४/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र शासनाने दि.०२/१२/२०२० रोजी एकत्रिकृत बांधकाम विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली UDCPR २०२० संपूर्ण महाराष्ट्रासाठी अंमलात आली. त्यामुळे यापूर्वी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये DCR २०१६ मधील तरतूदीअन्वये विकास परवानगी व इतर प्रस्ताव पारित केले जात होते. परंतु UDCPR २०२० अंमलात आलेनंतर त्यामध्ये DCR २०१६ मधील तरतूदीमध्ये बरेच बदल करणेत आलेले आहे. त्यामध्ये महानगरपालिकेसाठी विचार केला असता, मोठ्या प्रमाणावर बांधकाम परवाना प्रस्ताव पारित होते असून त्यामध्ये निव्वळ प्रिमियम FSI व Ancillary FSI चा वापर होत असलेचे दिसून आले आहे. तसेच विकास योजना नकाशानुसार आरक्षण व नियोजीत रस्त्याने बाधीत रस्त्याबाबत भुसंपादन रोख रक्कम स्वरुपात दिले जात असल्याचे निदर्शनास आलेले आहे. यामुळे महानगरपालिकेवर आर्थिक भार पडत असलेचे दिसून आले आहे.

त्यामुळे UDCPR २०२० मधील RCC, Compulsory TDR, Construction Amenity TDR तसेच Accommodation Reservation Policy, Slum TDR व Lowrisk व Moderate Riskbased बांधकाम परवाने या तरतूदींची प्रभावीपणे अंमलबजावणी केलेस, वरील नमूद केलेनुसार मनपा वरील आर्थिक भार कमी होणेस मदत होईल. तसेच Riskbased बांधकाम परवानगीची प्रभावी अंमलबजावणी केलेस ते नागरिकांच्या सोईचे होणार आहे.

वरील वस्तुस्थितीनुसार एकत्रिकृत बांधकाम विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली UDCPR २०२० हे डिसेंबर २०२० मध्ये लागू होईदेखील आज अखेर उपरोक्त नमूद तरतूदींचा प्रभावीपणे वापर केला जात नसलेने महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर तरतूदींचा प्रभावी अवलंब करणेसाठी मनपा क्षेत्रातील वास्तुविशारद, क्रिडाई, आर्किटेक्ट / इंजिनियर असो. तसेच मनपातील तांत्रिक अधिकारी यांची अभ्यासगट समिती स्थापन करुन सर्व संबंधितांचे अभिप्राय घेऊन त्यानंतर वरील तरतूदींचा अवलंब करणे सोईचे होणार असल्याने त्यानुषंगाने अभ्यासगट समिती स्थापन करुन वेगवेगळ्या मुद्यांवर चर्चा होवून खालील प्रमाणे शिफारस करणेत आलेली आहे.

१) Reservation Credit Certificate (R.C.C.);

UDCPR-२०२० मधील नियम क्र. ११.३ नुसार R.C.C. (Reservation Credit Certificate) देणेची कार्यवाही तात्काळ सुरु करणेत यावी. इतर महानगरपालिकेमध्ये R.C.C. (Reservation Credit Certificate) बाबत त्यांचेकडील कार्यपध्दतीचा अवलंब करुन सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची कार्यपध्दती निश्चित करणे.

...२...

२) Compulsory TDR चे वापराबाबत;

सद्यस्थितीमध्ये बांधकाम परवाना प्रस्तावामध्ये Basic FSI, Ancillary FSI चा प्रथम वापर केला जात आहे. त्यानंतर Premium FSI वापरण्यात येत असून अत्यंत कमी प्रकरणांमध्ये TDR वापर केला जात आहे. तरी TDR चा वापर सुयोग्य प्रमाणात होणेच्या हेतूने मा.राज्य शासनाने निर्देशित केल्या प्रमाणे Premium FSI व TDR यांचा वापर समप्रमाणात अर्थात ५०% : ५०% याप्रकारे करणेबाबत आवश्यक व बंधनकारक आहे. त्यानुसार यापुढे बांधकाम परवाना प्रस्तावामध्ये जेवढ्याप्रमाणावर Premium घेणेचे असेल तेवढे TDR देखील वापरणे बंधनकारक केलेस Compulsory TDR मार्केटला चालना मिळेल व विकास आराखडा अंमलबजावणी करणे.

त्यानुसार ७५०.०० चौ.मी. बरील सर्व भुखंडामध्ये Premium FSI व TDR हा समप्रमाणत वापरणे करणे याची अंमलबजावणी तात्काळ करणे योग्य होईल. Credai / AEA (Architect Engineer Association) यांच्या मागणी प्रमाणे लहान व मध्यम गटाच्या बिल्डर्स, डेव्हलपर्स व सर्व इंजिनियर्स यांना यांना या धोरणाच्या अनुषंगाने परिपूर्ण तयारीसाठी आवश्यक वेळ मिळावा म्हणून ६००.०० ते ७५०.०० चौ.मी. वरील भुखंडामध्ये Premium FSI व TDR हे समप्रमाणात वापरणेची तरतूद दिनांक १ जुलै २०२५ पासून अंमलात आणणे योग्य वाटते व ६००.०० चौ.मी. पर्यंतच्या भुखंडावरती दिनांक १ डिसेंबर २०२५ पासून Premium FSI व TDR हे समप्रमाणात वापरणेची तरतूद लागू करणे योग्य होईल. याबाबत शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करणे योग्य होईल व त्यानुषंगाने आवश्यक बदल BPMS कार्यप्रणालीमध्ये करुन Compulsory TDR ची प्रभावी अंमलबजावणी करणे.

३) Transferable Development Rights TDR against Construction of Amenity;

Construction TDR च्या नियमावलीमध्ये UDCPR-२०२० प्रमाणे आजरोजी Multiplying Factor १.३५ असून Construction TDR यास प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे व त्याकरीता आजरोजी दाखल होणा-या प्रस्तावामध्ये Multiplying Factor १.३५ TDR देणे योग्य होईल व भविष्यात सदरचा Factor पुन्हा २.० करणेसाठी मा.शासनास प्रस्ताव पाठवून त्यास मान्यता मिळालेनंतर Multiplying Factor २.० नुसार TDR देणे.

४) Accommodation Reservation Policy (AR);

मनपाच्या नगररचना विभागाने सर्व आरक्षणाने बाधीत क्षेत्राची सविस्तर यादी तयार करुन Credai / AEA (Architect Engineer Association) यांना अवगत करावी. जेणे करुन संबंधितांमार्फत देखील AR अन्वये आरक्षण ताब्यात घेणे सुलभ होईल. तरी AR बाबतची कार्यपध्दती UDCPR-२०२० मधील तरतूदीनुसार तात्काळ लागू करणे.

५) Slum TDR;

महानगरपालिका क्षेत्रात अद्याप Slum TDR Generate झालेला नाही. सदरचे घोषित झोपडपट्टी / Slum हे विकसीत करुन प्रथमत: Slum TDR Generate करुन त्याचा वापर बांधकाम परवाना प्रस्तावामध्ये UDCPR-२०२० प्रमाणे एकूण TDR च्या ३०% पर्यंत Slum TDR म्हणून बंधनकारक करणेत यावा. त्यासाठी महानगरपालिकेची कार्यपध्दती निश्चित करणे.

६) Low Risk व Moderate Riskbased Building permissions;

UDCPR-२०२० मधील Appendix K नुसार नोंदणीकृत परवानाधारक स्थापत्य अभियंते / वास्तुविशारद यांनी बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र UDCPR-२०२० मधील तरतूदीनुसार त्यांच्या स्तरावरुन देणे उचित होईल मात्र नियोजित बांधकाम हे कोणत्याही प्रकारे नियमबाह्यपणे होणार नाही, याची जबाबदारी संबंधित स्थापत्य अभियंता / वास्तुविशारद यांच्यावर निश्चित करणेची तरतूद आहे. तसे केल्याने ३००.०० चौ.मी. च्या भुखंडामध्ये बांधकाम परवानगी देणे अधिक सूलभ व जलद होईल. त्यानुषंगाने Lowrisk व Moderate Riskbased प्रस्तावांनाही चालना देणेचा प्रयत्न असून त्याची महानगरपालिकेसाठीची कार्यपध्दती निश्चित करणे.

UDCPR-२०२० मधील नमूद तरतूदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी उपरोक्त नमुद अ.क्र.१ ते ६ मधील प्रस्तावास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत असून, सदर धोरणात्मक निर्णयाबाबत भविष्यात त्यामध्ये बदल अथवा कमीजादा करणेचे सर्व अधिकार प्राधिकरणास राखून ठेवीत आहे.

सह. संचालक (न.र.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १३७ **दिनांक :-** १५/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (नगररचना विभाग,सांगली) यांचे दि.१४/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील कुपवाड येथील सर्व्हे नं.१६४ (जुना सर्व्हे नं. २१२) यांचे ७/१२ उताऱ्यानुसार एकूण क्षेत्र ०.८१ आर अंसून त्यापैकी अक्षय राजकुमार पाटील व इतर यांचे हिश्श्याचे ०.४०.५० आर क्षेत्राचे प्राथमिक रेखांकन दि.१०/०८/२०२२ रोजी मंजूर केले असून मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दिनांक ०२/०२/२०२३ रोजी बिगर शेती आदेश मंजूर झाला आहे.

मंजूर रेखांकनानुसार डी.पी. रस्त्याची कब्जेपट्टी श्री. अक्षय राजकुमार पाटील व इतर यांनी दि.२७/०९/२०२३ रोजी दिलेली आहे. सदर कब्जेपट्टी मधील डी.पी. रस्त्याखालील क्षेत्र १८२०.९४ चौ.मी. क्षेत्र नुकसान भरपाई रक्कम स्वरूपात मिळणेचे अटीवर दिलेली आहे. त्यानुसार सदर क्षेत्रास ७/१२ पत्रकी मनपाच्या नावाची नोंद केली आहे.

सदर रेखांकनातून जाणारा ३०.४८ मी. डी.पी. रस्ता हा कुपवाड फाटा (चैत्रबन नाला) ते सुतगिरणी रस्त्यापर्यंत जाणारा असून त्यामधील सर्व्हे नं.२११,२१९,२२०,२२१ या जमिनीच्या मिळकतधारकांना नुकसान भरपाई खाजगी वाटाघाटीने देऊन डी.पी. रस्ते ताब्यात घेतले आहे. त्यामुळे सदर सर्व्हे नं.२१२ मधील डि.पी. रस्ते ताब्यात घेणे आवश्यक आहे. सदर ३०.४८ मी डी.पी. रस्त्याच्या सन्मुख प्ले ग्राऊंड, व्हिजीटेबल मार्केट, गार्डन, शैपिंग सेंटर महिला वस्तीगृह, बस स्टॉप ही आरक्षणे आहेत. सदरची आरक्षणे ही गर्दीची व एकाच ठिकाणी असलेने रस्ता रुंदी ३०.४८ मी. असणे आवश्यक आहे. सबब आवश्यक रस्ता रुंदीचा निकष न लावता संपूर्ण डी.पी. रस्त्याखालील क्षेत्राचा विचर करणे आवश्यक आहे. तसेच यापुर्वी स.न. २१९,२२०,२२१ मधून जाणाऱ्या सदर ३०.० मी व १८.० मी डी.पी. रस्त्याची नुकसान भरपाई ही संपूर्ण डी.पी. रस्त्याखालील क्षेत्रास देणेत आली आहे. त्याची कार्यालयीन टिप्पणी लगत केली आहे.

केंद्र शासनाच्या भूमी संपादन, पूर्नवसन पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा अधिनियम २०१३ (The right to fair compensation and transparmar in land acquisition rehabilitation and restlessment Act २०१३) हा नवीन कायदा दि.०१/०१/२०१४ पासून अंमलात आला आहे. भूसंपादन प्रकरणामध्ये मुल्यांकन करताना जमीन मालकांना दिलासा रक्कम यापुर्वीच्या कायद्यानुसार ३० टक्के प्रमाणे देण्यात येत होती. आता नवीन कायद्यानुसार ती १०० टक्के करण्यात आली आहे.

सबब सदरची नुकसान भरपाई देणे शक्य असलेल्या १८२०.९४ चौ.मी. जागेच्या चालू शासकीय मुल्यांकन दरानुसार सन २०२३-२४ मधील वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यानुसार विभाग क्र.१३/८७ अंतर्गत सांगली कुपवाड रस्त्याच्या दक्षिणेकडील क्षेत्र खुली जमीन रूपये ४२८०/- प्रति चौ.मी. दर आहे. जमिनीची किंमत मुल्य अंदाजे १८२०.९४ = ४२८०.०० = ७७,९३,६२३/- इतकी होत आहे.

अ.क्र.	तपशिल	रक्कम रु.
१	जमिनीची किंमत	७७,९३,६२३/-
२	१०० टक्के दिलासा रक्कम	७७,९३,६२३/-
	एकूण	**१,५५,८७,२४६/-**

वरील मुल्यांकनाच्या अनुषंगाने अतिरीक्त घटक रक्कम रु.१८,७०,४७०/- मात्र वजा करणेत आली असून नुकसान भसपाई देणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२६(अ) नुसार खाजगी वाटाघाटीमध्ये वरील रक्कम रु.१,५५,८७,२४६/- मात्र स्विकारणेस मिळकत धारक संमत असलेने खाजगी वाटाघाटीने सदर भुसंपादन रक्कम अंतिम करून, सदरची जागा महानगरपालिकेच्या नावावर झाल्यानंतर सदर डी.पी.रस्त्याने बाधीत क्षेत्राची नुकसान भरपाई देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सह. संचालक (न.र.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १३८ **दिनांक :-** १५/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (नगररचना विभाग,सांगली) यांचे दि.१४/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील कुपवाड येथील सर्व्हे नं.१६४ (जुना सर्व्हे नं. २१२) यांचे ७/१२ उताऱ्यानुसार एकूण क्षेत्र ०.८१ आर असून त्यापैकी सिमा अरविंद कोल्हापूरे व इतर यांचे हिश्श्याचे ०.४०.५० आर क्षेत्राचे प्राथमिक रेखांकन दि.१०/०८/२०२२ रोजी मंजूर केले असून मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दिनांक ०२/०२/२०२३ रोजी बिगर शेती आदेश मंजूर झाला आहे.

मंजूर रेखांकनानुसार डी.पी. रस्त्याची कब्जेपट्टी सिमा अरविंद कोल्हापूरे व इतर यांनी दि.२७/०९/२०२३ रोजी दिलेली आहे. सदर कब्जेपट्टी मधील डी.पी. रस्त्याखालील क्षेत्र १८३७.५० चौ.मी. क्षेत्र नुकसान भरपाई रक्कम स्वरूपात मिळणेचे अटीवर दिलेली आहे. त्यानुसार सदर क्षेत्रास ७/१२ पत्रकी मनपाच्या नावाची नोंद केली आहे.

सदर रेखांकनातून जाणारा ३०.४८ मी डी.पी. रस्ता हा कुपवाड फाटा (चैत्रबन नाला) ते सुतगिरणी रस्त्यापर्यंत जाणारा असून त्यामधील सर्व्हे नं.२११,२१९,२०२०,२२१ या जमिनीच्या मिळकतधारकांना नुकसान भरपाई खाजगी वाटाघाटीने देऊन डी.पी. रस्ते ताब्यात घेतले आहे. त्यामुळे सदर सर्व्हे नं. २१२ मधील डी.पी. रस्ते ताब्यात घेणे आवश्यक आहे. सदर ३०.४८ मी. डी.पी. रस्त्याच्या सन्मुख प्ले ग्राऊंड, व्हिजीटेबल मार्केट, गार्डन, शैपिंग सेंटर महिला वस्तीगृह, बस स्टॉप ही आरक्षणे आहेत. सदरची आरक्षणे ही गर्दीची व एकाच ठिकाणी असलेने रस्ता रुंदी ३०.४८ मी. असणे आवश्यक आहे. सबब आवश्यक रस्ता रुंदीचा निकष न लावता संपूर्ण डी.पी. रस्त्याखालील क्षेत्राचा विचर करणे आवश्यक आहे. तसेच यापुर्वी स.न. २१९,२२०,२२१ मधून जाणाऱ्या सदर ३०.० मी व १८.० मी डी.पी. रस्त्याची नुकसान भरपाई ही संपूर्ण डी.पी. रस्त्याखालील क्षेत्रास देणेत आली आहे. त्याची कार्यालयीन टिप्पणी लगत केली आहे.

केंद्र शासनाच्या भूमी संपादन, पूर्नवसन पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा अधिनियम २०१३ (The right to fair compensation and transparmar in land acquisition rehabilitation and restlessment Act २०१३) हा नवीन कायदा दि.०१/०१/२०२४ पासून अंमलात आला आहे. भूसंपादन प्रकरणामध्ये मुल्यांकन करताना जमीन मालकांना दिलासा रक्कम यापुर्वीच्या कायद्यानुसार ३० टक्के प्रमाणे देण्यात येत होती. आता नवीन कायद्यानुसार ती १०० टक्के करण्यात आली आहे.

सबब सदरची नुकसान भरपाई देणे शक्य असलेल्या १८३७.५० चौ.मी. जागेच्या चालू शासकीय मुल्यांकन दरानुसार सन २०२३-२४ मधील वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यानुसार विभाग क्र. १३/८७ अंतर्गत सांगली कुपवाड रस्त्याच्या दक्षिणेकडील क्षेत्र खुली जमीन रूपये ४२८०/- प्रति चौ.मी. दर आहे. जमिनीची किंमत मुल्य अंदाजे १८३७.५० x = ४२८०.०० = ७८,६४,५००/- इतकी होत आहे.

अ.क्र.	तपशिल	रक्कम रु.
१	जमिनीची किंमत	७८,६४,५००/-
२	१०० टक्के दिलासा रक्कम	७८,६४,५००/-
	एकूण	**१,५७,२९,०००/-**

वरील मुल्यांकनाच्या अनुषंगाने अतिरीक्त घटक रक्कम रु.१८,८७,४६०/- मात्र वजा करणेत आली असून नुकसान भसपाई देणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२६(अ) नुसार खाजगी वाटाघाटीमध्ये वरील रक्कम रु.१,५७,२९,०००/- मात्र स्विकारणेस मिळकत धारक संमत असलेने खाजगी वाटाघाटीने सदर भुसंपादन रक्कम अंतिम करून, सदरची जागा महानगरपालिकेच्या नावावर झाल्यानंतर सदर डी.पी. रस्त्याने बाधीत क्षेत्राची नुकसान भरपाई देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सह संचालक (न.र.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १३९ **दिनांक :-** १५/१०/२०२४

विषय क्रमांक :- ०७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१५/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील कोल्हापूर रोड आकाशवाणी चौकास शौर्य चक्र विजेते विंग कमांडर प्रकाश नवले चौक असे नामकरण करणेकामी नामकरणाचा प्राथमिक इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १४० **दिनांक :- १५/१०/२०२४**

विषय क्रमांक :- ०८

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग,सांगली) यांचे दि.१५/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील काळी खण लगत उद्यानाला महावीर चक्र विजेते शहीद श्री.पांडूरंग साळुंखे उद्यान असे नामकरण करणेकामी नामकरणाचा प्राथमिक इरादा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

माध्यमाला अधिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १४१ **दिनांक :- १५/१०/२०२४**

विषय क्रमांक :- ०९

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१५/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेस मंजूर झाले अनुदानानुसार सादर केले प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारीसो, सांगली यांचेकडील दि.२८/०७/२०२३ रोजीच्या आदेशान्वये र.रु.२५,१८,७७,५४८/- मात्रच्या एकूण १६१ कामांना तसेच दि.३१/०७/२०२३ रोजीच्या आदेशान्वये र.रु.९४,९९,६१६/- मात्रच्या एकूण ६ कामांना मिळण एकूण र.रु.२६,१३,७७,१६४/- मात्रच्या एकूण १६७ कामांना प्रशासकीय मान्यता मिळून निधी मंजूर झाल असून, सदर कामांपैकी काही कामे पूर्ण झाली असून काही कामे प्रगतीत आहेत.

सदर योजजेतील कामांच्या खर्चासाठी सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पातील E- १२११) लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना या लेखाशिर्षामध्ये र.रु.११,००,००,०००/- मात्रची तरतुद करणेत आली असून, सदर योजनेतील निधी हा १००% शासकीय असल्याने सदर लेखाशिर्षामध्ये वाढीव तरतुद मिळून एकूण र.रु.२६,१३,७७,१६४/- इतकी करणे आवश्यक असल्याने, सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पातील E- १२११) लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना या लेखाशिर्षामध्ये र.रु.२६,१३,७७,१६४/- मात्रची इतकी तरतुद करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७४२ **दिनांक :-** १५/१०/२०२४

विषय क्रमांक :- १०

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे दर सुधार समिती ठराव क्र.५ दि.२७/०९/२०२४ अवलोकनी घेणेत आला.

दर सुधार समिती अंतर्गत वैद्यकीय आरोग्यआधिकारी (स्वच्छता) यांचे दि.०९/०९/२०२४ चे पत्राअन्वये सांगली सां.मि.कु. शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात नागरिकांना अत्यावशक सुविधा देणे साठी शववाहिका, डॉगव्हॅन, फिरत शौचालय व मैला उपसागाडी हि वाहने योग्य शुल्क घेऊन पुरविली जातात. सध्या आकारण्यात येणारी शुल्क ही सांगली नगरपालिकेच्या दरानुसार साकारली जाते. यामध्ये दरवर्षी दरवाढ होणे आवश्यक होती पण ती झालेली नाही. उपरोक्त ठरावानुसार सदर शुल्कातील सुधारीत दरवाढ खाली नमुद केलेप्रमाणे प्रस्तावित करणेत आलेली आहे.

अ. क्र.	वाहने व कार्यक्षेत्र	सध्याचे दर	सुचवणेत आलेले वाढीव दर
१.	शववाहिका मनपा हद्दी बाहेर	मनपा हद्दी बाहेर दर निश्चित नाहीत.	अग्नीशामक वाहनाच्या दराप्रमाणे आकारणेत यावे. प्रति कि.मी. रु.५०/- मात्र
२.	डॉग व्हॅन मनपा हद्दी बाहेर	मनपा हद्दी बाहेर दर निश्चित नाहीत.	अग्नीशामक वाहनाच्या दराप्रमाणे आकारणेत यावे. प्रति कि.मी. रु. ५०/- मात्र
३.	फिरते शौचालय मनपा हद्दीत	प्रति दिनी २०० रु. मात्र	प्रति दिनी 500रु. मात्र
४.	फिरते शौचालय मनपा हद्दी बाहेर	प्रति दिनी २०० रु. मात्र	प्रति दिनी 1000रु. मात्र (वाहतूक खर्च स्वत: करणेच्या अटीवर
५.	मैला उपसा गाडी मनपा हद्दीत	एक खेप रु. ५०० मात्र	एक खेप रु. 1000 मात्र
६.	मैला उपसा गाडी मनपा हद्दी बाहेर	सध्या दर निश्चित नाहीत.	अग्नीशामक वाहनानुसार प्रति कि.मी. रु. ५०/- मात्र

वरील प्रमाणे दर सुधार समितीच्या शिफारशीनुसार शुल्क वाढ करणेस ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

उ. आरोग्याधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७४३ **दिनांक :-** १५/१०/२०२४

विषय क्रमांक :- ११

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (कार्यशाळा विभाग) यांचे दि.१५/१०/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेतले.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या दैनंदिन कचरा उठाव,मैला उठाव,डास प्रतिबंध व इतर स्वच्छता विषयक कामासाठी सार्व.आरोग्य विभागाकडील क- २ साफ सफाई E-०२८० कंटेनर घंटागाडी,गाळागाडी खरेदी व अनुषंगिक देखभाल दुरुस्ती मधील शिल्लक रक्कम, क-२ साफसफाई व सोई E-०२५८ वाहन देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षावर प्रस्तावित केले फॉर्म नं.१० नुसार र.रु.७५ लक्ष रक्कम पुनर्विनियोजन करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांख्यिकी अधिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १४४ **दिनांक :-** १५/१०/२०२४

विषय क्रमांक :- १२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतचे दर सुधार समिती ठराव क्र.७ दि.११/१०/२०२४ रोजीचे अग्निशमन विभागाकडील फायर ऑडिट करणेबाबतचे सुधारीत शुल्क निश्चितीचा ठराव अवलोकनी घेतला.

अग्निशमन विभागाकडे सां.मि.कु. महानगरपालिका क्षेत्रातील विविध आस्थापना, व्यवसाय, इमारती, हॉस्पीटल, शाळा, महाविद्यालये, शासकीय व निमशासकीय इमारत अन्य इमारत धारक यांच्या इमारतीचे फायर ऑडीट करुन मिळणेबाबत मागणी केली जाते.

फायर ऑडिट करण्याबाबतचे शुल्क ठरवण्यात आलेले नाहीत त्याकरीता शुल्क निश्चित करणे आवश्यक होते. त्यानुसार शुल्क ठरविण्याचे सविस्तर विवरण व तपशील खालीलप्रमाणे आहे.

(परिशिष्ठ क)

तपशील	शुल्क	शेरा
फायर ऑडीट शासकीय/निमशासकीय इमारती, विविध आस्थापना, व्यवसाय,इमारती, हॉस्पीटल, शाळा, महाविदयालये, यामध्ये नमुद नसलेले इतर सर्व ० ते २०० चौ. मीटर पर्यंत	६,०००/- प्रत्येक इमारत/विंग	(सां.मि.कु. शहर महानगरपालिकेच्या इमारतींना विनाशुल्क) **(मनपा क्षेत्र मर्यादित)**
२०१ ते ५०० चौ. मीटर	९,०००/- प्रत्येक इमारत/विंग	
५०१ चौ.मीटर च्या पुढील ५०१ चौ.मी. पुढे असलेल्या प्रत्येक चौ.मी. करिता रु. ५०/- प्रति चौ.मी. शुल्क कारण्यात येईल.	५०/- प्रति. चौ.मी. (प्रति इमारत/विंग)	

(परिशिष्ठ ख)

तपशील	दर
अनुभवासाठी विनामोबदला अग्निशमन विभागाकडे येणाऱ्या उमेदवाराकडून भरुन घेण्याची रक्कम (०६ महीन्याकरता) यामध्ये महानगरपालिकेकडून उमेदवारास कोणतेही वेतन, मानधन इ. देय नाही.उमेदवाराने स्वत:चा विमा, निवास,भोजन स्वत: करणे.	रु. ५००/- प्रति महिना (प्रति उमेदवार)
फायर कॉलेज खाजगी/शासन मान्य संस्थेकडील अग्निशमन / सेफटी प्रशिक्षण देणाऱ्या संस्थानी त्यांचेकडील प्रशिक्षणा अंतर्गत मागणीप्रमाणे प्रक्टीकल अॅटॅचमेंट करीता उमेदवार महानगरपालिका अग्निशमन विभागाकडे पाठविल्यास त्यांचेकडून भरुन घेण्याचे शुल्क. (०१ ते ३० दिवसापर्यंत) यामध्ये महानगरपालिकेकडून उमेदवारास कोणतेही वेतन, मानधन इ. देय नाही. उमेदवाराने स्वत:चा विमा, निवास,भोजन स्वत: करणे.	रु. १५००/- (०१ ते ३० दिवसापर्यंत प्रति उमेदवार)

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक १२/२०२३-२४ ठराव क्रमांक ७३ दिनांक १९/०१/२०२४ अन्वये **अंतिम आग संरक्षक मान्यता** दाखला शासन स्तरावरुन नुतणीकरण करुन घेणे बंधनकारक करण्यात येत नाही तोपर्यंत नुतणीकरण करुन देण्याची प्रक्रिया थांबविणेस मान्यता देण्यात आली आहे.

तथापी, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपायोजना अधिनियम २००६ सुधारणा अधिनियमन २०२३ अन्वये Final Fire Safety Approval) /अंतिम नाहरकत दाखला घेतल्यानंतर प्रत्येक वर्षी **जानेवारी व जुलै** महिन्यात अधिकृत लायसन्स धारक यांचेकडील **बी फॉर्म** अग्निशमन विभागाकडे जमा करणे आवश्यक आहे. असे न केल्यास संबंधित आस्थापनांचे वीज व पाणी पुरवठा बंद व इमारत सीलबंद करण्याची तरतुद उक्त अधिनियमात आहे.

त्यामुळे उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार Final Fire Safety Approval) /अंतिम नाहरकत दाखला घेतलेल्या सर्वच आस्थापनांनी प्रत्येक वर्षी **जानेवारी व जुलै** महिन्यात अधिकृत लायसन्स धारक यांचेकडील **बी फॉर्म** अग्निशमन विभागाकडे जमा न केल्यास त्यांना मा. संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांचे मान्यतेने त्यांच्यावर दंडात्मक शुल्क वसुल करण्याचा तपशील पुढील प्रमाणे.

... २ ...

(परिशिष्ठ ग)

अ.क्र.	तपशील	दर	शेरा
०१	०१ जानेवारी ते ३१ जानेवारी पर्यंत अधिकृत लायसन्स धारक यांचेकडील **बी फॉर्म** अग्निशमन विभागाकडे जमा न केल्यास I) सर्व प्रकारचे व्यावसायिक व गोदामे (औद्योगिकखेरीज) II) औद्योगिक उत्पादन करणारे कारखाने/ व्यवसाय III) हॉस्पीटल IV) इतर सर्व	 ७,०००/- १०,०००/- ८,०००/- ८,०००/-	सदरचे शुल्क प्रत्येक वर्षीच्या ०६ महिने कालावधीचे आहेत. प्रत्येक वर्षीच्या जानेवारी व जुलै महिन्यात **बी फॉर्म** जमा न केल्यास जेवढे वर्षे / महिने जमा केले नाही तेवढया मागील कालावधीचे शुल्क स्वतंत्र आकारले जाईल. **(मनपा क्षेत्र मर्यादित)**
०२	०१ जुलै ते ३१ जुलै पर्यंत अधिकृत लायसन्स धारक यांचेकडील **बी फॉर्म** अग्निशमन विभागाकडे जमा न केल्यास I) सर्व प्रकारचे व्यावसायिक व गोदामे (औद्योगिकखेरीज) II) औद्योगिक उत्पादन करणारे कारखाने/ व्यवसाय III) हॉस्पीटल IV) इतर सर्व	 ७,०००/- १०,०००/- ८,०००/- ८,०००/-	

वरीलप्रमाणे सलग ०१ वर्षापर्यंत बी फॉर्म जमा न केल्यास दंडात्मक शुल्कासह लगतच्या पुढीलवर्षी अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्याची आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपायोजना अधिनियम २००६ व सुधारणा अधिनियम २०२३ अन्वये अनुसुची - एक मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या इमारती,उद्योग, व्यवसाय विविध आस्थापनांनी आग प्रतिबंधक उपायोजना केल्या नसल्यास व सदर ठिकाणी आग व आपत्कालिन परिस्थतीत अग्निशमन दलाने सेवा दिल्यास अशा आस्थापनांच्याकडून दंडात्मक शुल्क घेता येईल व त्यांचेकडून इमारतीस नियमानुसार फायर NOC घेण्याबाबत नोटीस देऊन पुर्तता करुन घेता येईल. त्याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे.

(परिशिष्ठ घ)

अ.क्र.	तपशील	दर
१	आग प्रतिबंध अधिनियमातील अनुसुची एक मध्ये नमुद सर्व आस्थापना व व्यवसाय दंडात्मक शुल्क अ) सर्व प्रकारचे व्यावसायिक व गोदामे (औद्योगिकखेरीज)	i) ० ते १०० चौ.मी. पर्यंत रु. ३,०००/- ii) १०१ ते २०० चौ.मी. पर्यंत रु. ६,०००/- iii) २०१ ते ४०० चौ.मी. पर्यंत रु. १०,०००/- iv) ४०१ ते ५०० चौ.मी. पर्यंत रु.१५,०००/- v) ५०१ ते ७०० चौ.मी. पर्यंत रु. २०,०००/-
२	ब) औद्योगिक उत्पादन करणारे कारखाने/ व्यवसाय प्रति इमारत/विंग/युनिट	i) ० ते २०० चौ.मी. पर्यंत रु. १०,०००/- ii) २०१ ते ४०० चौ.मी. पर्यंत रु. १५,०००/- iii) ४०१ ते ६०० चौ.मी. पर्यंत रु. २०,०००/- iv) ६०१ ते ८०० चौ.मी. पर्यंत रु. २५,०००/- v) ८०१ ते १००० चौ.मी. पर्यंत रु. ३०,०००/- vi) १००१ ते १५०० चौ.मी. पर्यंत रु. ३५,०००/- vii) १५०१ ते २००० चौ.मी. पर्यंत रु. ४०,०००/-

उपरोक्त प्रस्तावातील सर्व नमुद शुल्कामध्ये प्रत्येक आर्थिक वर्षात १० टक्के शुल्क वाढ करणेकामी मा.मुख्य अग्निशमन आधिकारी यांनी सादर केलेले विविध शुल्क वाढ प्रस्तावानुसार दर सुधार समिती ठराव क्र.७ दि.११/१०/२०२४ अन्वये केले शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

Both pages signed.

मुख्य अग्निशमन अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १२/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १४५ **दिनांक :- १५/१०/२०२४**

विषय क्रमांक :- १३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांन्वये,

सोबतची कार्यकारी अभियंता,पा.पु. व जलनि:सारण अभियंता यांनी दिलेली सूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली शहरामधील अस्तित्वात भुयारी गटार योजना फार जुनी आहे. वाढते शहरीकरण व नागरीकरणामुळे अस्तित्वात असलेल्या जलनि:सारण लाईन व पंपीग स्टेशनवर प्रचंड लोड आलेला आहे.

जुनी शहरीकरण वाढल्याने सततच्या वापराने लाईन जिर्ण होवून कमकुवत झालेल्या आहेत व त्यामुळे मागील ३ ते ४ वर्षात लाईन खचल्याचे प्रकारात वाढ झालेली आहे.

यावर्षी १०० फुटी रोड, गारपीर रोड, कबाडे हॉस्पीटल, अहिल्यादेवी होळकर चौक, मजीप्रा ऑफिस मागील बाजूस इ. शहरातील विविध ठिकाणी लाईन खचण्याच्या घटना घडलेल्या आहेत. लाईन खचल्यामुळे रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत ही वस्तुस्थिती आहे.

ड्रेनेज लाईन खचल्यामुळे दुरुस्तीचे काम केले नाही तर संपूर्ण लाईनमध्ये गाळ साठणेचे प्रमाण वाढून संपूर्ण लाईन लवकर खराब होणार आहे व पाण्याचा निचरा न झालेने गावभाग, खणभाग कोल्हापूर रोड, १०० फुटी रोड, विश्रामबाग, द. शिवाजीनगर परिसर इ. भागातील नागरीकांच्या सांडपाण्याचा निचरा होणार नाही व या संपूर्ण परिसरात सांडपाणी थांबून नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अशा घटना घडल्यावर असे काम त्वरित करता यावे यासाठी वार्षिक एजन्सी सन २३-२४ सालासाठी नियुक्ती केली असून त्याप्रमाणे कामे गतीने होण्यास मदत होते त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा व सांडपाणी प्रश्न निर्माण होण्याच्या पूर्वी लाईनचे काम पूर्ण करून सांडपाणी निचरा पूर्वस्थितीत करता येतो.

सध्या १०० फुटी रोड, गारपीर चौक व कबाडे हॉस्पीटल जवळील रस्त्यावरील लाईनवर खड्डे पडल्याने त्या ठिकाणच्या मागील परिसरातील ड्रेनेज पाईप लाईन मध्ये पाणी थांबून आहे. त्याठिकाणी इंजिन लावून पाणी उपसा केल्याशिवाय काम करता येणे अवघड आहे कारण लाईन १५ ते १८ फुट खोल आहेत व माती पण काळी असल्याने ढासळण्याची शक्यता भरपूर प्रमाणात आहे. कोल्हापूर रोड पंपीग स्टेशनमधील पंपही सततच्या वापराने बंद झालेले आहेत. अद्याप ते पंप चालू झाले नाहीत. लाईनमध्ये पाणी साचून राहू नये म्हणून पत्रकारनगर चंद्रकांत बंगलयाच्या समोरील बाजूस इंजिन लावून पाणी उपसा चालू केला आहे.

सदर ३ कामापैकी प्रथम ओव्हर फ्लो लाईनचे काम केले तर उपरोक्त ठिकाणी इंजिन लावून पाणी उपसा करणे कामीचा कालावधी कमी होण्याची शक्यता आहे.

सध्या तिन्ही ठिकाणच्या अंदाजपत्रकामध्ये इंजिन लावून २ महिने कालावधी गृहीत धरून अंदाजपत्रक तयार केले आहे. त्यामुळे नंतरच्या दोन्ही म्हणजेच १००फुटी रोड व गारपीर रोड येथील कामासाठीही इंजिन लावून उपसा करणेबाबतचा दिनावधी कमी होईल.

... २ ...

सध्या चालू असलेले वार्षिक एजन्सी ही २१.५०% कमी दराने आहे व सदरचे अंदाजपत्रक हे २१.५०% कमीने म्हणजेच अंदाजपत्रक एकत्रित र.रू.५,९१,०१,०१३/- मात्रने तयार करण्यात आलेली आहे. सदरची तिन्ही कामे करण्यास बराच दिनावधी लागणार असल्याने आणि सध्या वरील प्रकारच्या कामासाठी नियुक्त असलेल्या वार्षिक दर करार ठेकेदार यांची मंजूर खर्च मर्यादा १.५० कोटी ही सततच्या उदभवणाऱ्या कामासाठी खर्ची पडून संपत आली असल्याने अत्यावश्यक ती कामे मंजूर मक्तेदार श्री कुमार भालचंद्र आपटे, सांगली यांचेमार्फत मंजूर दर एस्टिमेंट पेक्षा २१.५०% कमीच्या दराने करून घेणे महानगरपालिकेच्या आर्थिक फायदयाचे ठरणार आहे. सदर वार्षिक एजन्सीची मुदत मार्च २०२५ पर्यंत आहे. सदर कामगिऱ्या अत्यावश्यक असलेने कामगिरीचा खर्च विकास निधी या फंडातून होणेचा आहे. सबब यासाठी नियुक्त दर कराराचा खर्च र.रू.१,५०,००,०००/- मध्ये आणखी वाढ करून र.रू.५,९१,०१,०१३/- मात्र पर्यंत अत्यावश्यक ती कामे करणे आवश्यक आहे.

उक्त कामी येणारा खर्च सन २०२४-२५ मधील अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष व द्विनोंद अनुक्रमे "E-०५८४) जलनि:सारण पाईप लाईन दुरूस्ती करणे, सांगली" "E-१०११) नवीन जलनि:सारण पाईप लाईन टाकणे, सांगली" "E-१०३९) विकास निधी" "E-०६१०) विद्यमान मेनहोल चेंबर दुरूस्ती करणे," "प्रभाग विकासिनधी" व "स्थानिक विकासनिधी" या लेखाशिर्षामधील उपलब्ध तरतूदीमधून करणेस मा.प्रशासक स्थायी समिती ठराव क्र.११५ दि.११/१०/२०२४ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

परंतु सद्या उपरोक्त प्रस्तावानुसार कामगिरीचा खर्च करणेस सद्या विकास निधीसाठी मंजूर अर्थसंकल्पामध्ये काहीही तरतुद केलेली नाही. याकरीता विकास निधी मध्ये उपरोक्त प्रस्तावानुसार आवश्यक ती तरतूद करणे आवश्यक असल्याने, सन २०२४-२५ या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष "E-१११२- मा.आयुक्त निधी र.रु.७ कोटी मधून "E-१०३९- विकास निधी या लेखाशिर्षावर र.रु.६ कोटी तरतूद पुनर्विनियोजन करणे उचित होणार आहे. त्यानुसार लगत सादर केलेल्या नमुना नं.१० नुसार प्रस्तावित केलेप्रमाणे रक्कम तबदिल करणेस व उक्त कामी येणारा खर्च E-१०३९- विकास निधी मधून करणेस ही सभा मान्यता देत आहे.

both page signed)

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुख्यलेखाधिकारी/जलनिःसारण अभियंता.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका